Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

# चंद्रपूर जिल्हयातील आदिवासींच्या आर्थिक स्थितीचे चिकित्सक अध्ययन

**श्री. नितिन रमेश लांजेवार,** संशोधनकर्ता एम.ए. (अर्थ.,इंग्रजी), बी.एड., सेट (अर्थ), लोकमान्य विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, भद्रावती, जि. चंद्रपूर

**प्रा. डॉ. एन. जी. उमाटे,** संशोधन मार्गदर्शक एम.ए.(अर्थ.) पीएच.डी. एम.ए. (समाजशास्त्र, राज्यशास्त्र) विवेकानंद महाविद्यालय, भद्रावती, जि. चंद्रपूर

**गोषवारा**

भारतातील आदिवासी समुदायांची आर्थिक स्थिती त्यांच्या ऐतिहासिक उपेक्षिततेमुळे आणि सततच्या सामाजिक-आर्थिक आव्हानांमुळे एक महत्त्वाचा विषय राहिली आहे. प्रस्तुत संशोधनकार्यात चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासींच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासात आदिवासींच्या आर्थिक स्थिती संबंधित महत्वपूर्ण असणाऱ्या प्रमुख घटकांशी संबंधित शोध घेण्यात आला आहे. प्राथमिक माहिती सर्वेक्षण आणि मुलाखतीद्वारे प्राप्त करण्यात आली आहे. हे संशोधन चंद्रपूरमधील आदिवासी समुदायातील जनतेला भेडसावणाऱ्या असमानतेवर प्रकाश टाकतो. प्रस्तुत संशोधनकार्यात संभाव्यता पद्धतीतील साधा यादृच्छिक नमुना निवड पद्धतीद्वारे एकुण 450 आदिवासी नागरिकांची निवड करण्यात आली आहे. प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक संशोधन आराखडयाची निवड करण्यात आली आहे. अध्ययनात प्राप्त झालेल्या माहितीवरुन वारंवारीता व बहुलक काढण्यात आले. त्याचप्रमाणे माहितीच्या विश्लेषणाकरीता काई वर्ग मूल्य चाचणीचा वापर करण्यात आला. अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की अध्ययन क्षेत्रातील बहुतांश आदिवासी नागरिक मजूरी करतात व त्यांचे मासिक उत्पन्न रू. 5000 - 10000 इतके आहे. अध्ययन क्षेत्रातील बहुतांश आदिवासी नागरिकांचा खर्चाचे प्रमाण उत्पन्नाच्या 60 ते 69 टक्के असुन व्यवसायातुन मिळणारे उत्पन्न पर्याप्त नसल्याचे आढळले.

**सुचक शब्दः** आदिवासी अर्थव्यवस्था, चंद्रपूर जिल्हा, आदिवासी विकास

## 1. प्रस्तावना

महाराष्ट्राच्या चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी समुदायांची आर्थिक स्थिती मुख्यतः शेतीवर अवलंबून आहे. अनेक आदिवासी शेती कामगार म्हणून देखील काम करतात किंवा इतर प्रकारचे शारीरिक श्रम करतात. तथापि, या उपजीविकेमुळे अनेकदा कमी उत्पन्न आणि दारिद्र्याचे प्रमाण जास्त असते. जिल्ह्यातील आदिवासी जनतेला अपुरा विकास, कमकुवत पायाभूत सुविधा आणि बेरोजगारीशी संबंधित आव्हानांचा सामना करावा लागतो आहे, विशेषतः ग्रामीण भागात. चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी समुदाय शेतीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत, विशेषतः स्थलांतरित शेती, जी कठीण असू शकते आणि इतर कृषी पद्धतींच्या तुलनेत कमी पीक देते. ते बांबू, महुवा, तेंदूची पाने आणि सागवान लाकूड यासारख्या संसाधनांसाठी देखील जंगलांवर अवलंबून असतात, जे त्यांच्या उपजीविकेसाठी महत्वाचे आहेत. अनेक आदिवासी कुटुंबांचे उत्पन्न कमी आहे, काहींचे उत्पन्न दारिद्र्यरेषेखाली आहे. हे मुख्यतः त्यांच्या जमिनीची कमी उत्पादकता, रोजगाराच्या मर्यादित संधी आणि कर्ज आणि इतर आर्थिक सेवा मिळविण्याच्या आव्हानांमुळे होते.

चंद्रपूर जिल्हा अपुरा विकास आणि कमकुवत पायाभूत सुविधांमुळे ग्रस्त आहे, ज्यामुळे आदिवासी



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

समुदायांना तोंड द्यावे लागणारे आर्थिक संकट आणखी वाढते. यामध्ये शिक्षण, आरोग्यसेवा आणि मर्यादित मूलभूत सुविधा समाविष्ट आहे. बेरोजगारी ही एक महत्त्वाची समस्या आहे, कारण अनेक आदिवासी रोजगाराच्या शोधात शहरी भागात स्थलांतरित होतात. यामुळे सामाजिक आणि आर्थिक आव्हाने आणखी वाढतात. चंद्रपूरमधील जिल्ह्यातील आदिवासी समुदायांसाठी शाश्वत आणि वैविध्यपूर्ण उपजीविकेचे पर्याय शोधण्याची आणि त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे, जसे की वनसंपत्तीपासून मूल्यवर्धित उत्पादनांना प्रोत्साहन देणे, नवीन कौशल्यांचे प्रशिक्षण देणे आणि बाजारपेठ आणि कर्जाची उपलब्धता सुधारणे. वरील बाबींचा विचार करून प्रस्तुत संशोधनकार्यात चंद्रपूर जिल्हयातील आदिवासींच्या आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

**2. संशोधन प्रक्रिया:**

प्रस्तुत संशोधनकार्यात निर्दोष माहिती मिळण्यासाठी सर्वेक्षण व विश्लेषण पद्धतीचा उपयोग करण्यात आला. अध्ययन वस्तुची (आदिवासी विकासासंबंधित) वर्तमान स्थिती कशाप्रकारे आहे याचा अभ्यास करण्याकरीता उपयोगात आणल्या जाणारी ही एकमात्र पद्धती आहे. संशोधनाच्या क्षेत्रामध्ये या पद्धतीला दुसरा दर्जा प्राप्त आहे. परंतु जास्तीत जास्त प्रमाणात संशोधनकर्ता व्यापकरूपाने हया पद्धतीचा प्रयोग करतात असे आढळून आलेले आहे. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश व हेतू या पद्धतीच्या व्यतीरिक्त दुसऱ्या कोणत्या पद्धतीने साध्य होऊ शकत नसल्याने संशोधन कऱ्याने या पद्धतीची निवड केली. प्रस्तूत संशोधनकार्यात संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्याचा अध्ययन विश्व म्हणून विचार करण्यात आला व चंद्रपूर जिल्हातील सर्व आदिवासी नागरिक जनसंख्येत मोडतात.

प्रस्तुत संशोधनकार्यात संभाव्यता पद्धतीतील साधा यादृच्छिक नमुना निवड पद्धतीद्वारे एकुण 450 आदिवासी नागरिकांची निवड करण्यात आली आहे. प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक संशोधन आराखडयाची निवड करण्यात आली आहे. अध्ययनात माहिती संकलित करण्याकरिता प्रमाणीकृत पद्धतीचा व मुलाखत अनुसुचीचा उपयोग करण्यात आला. तथ्य संकलनासाठी सर्वेक्षण माध्यमाने माहिती प्राप्त केल्या गेली. तथ्य संकलनासाठी संबंधित साहित्य, विविध दैनिके, साप्ताहिके, मासिके, वार्षिकांक, पुस्तके, ग्रंथ, नियतकालिके व इतर प्रकाशित साहित्यांचे अध्ययन करण्यात आले. संशोधनकार्यात प्राप्त झालेल्या माहितीवरुन वारंवारीता व बहुलक काढण्यात आले. त्याचप्रमाणे माहितीच्या विश्लेषणाकरीता काई वर्ग मूल्य चाचणीचा वापर करण्यात आला व संभाव्यता पातळी 0.05 निर्धारीत करण्यात आली.

**3. सांख्यिकीय विश्लेषण व विवेचन**

**3.1 आदिवासी नागरिकांचे वयानुसार वर्गीकरण**

**सारणी क्र. 1:** आदिवासी नागरीकांचे वयानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी

| वयोगट | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| 25 पेक्षा कमी | 34 | 7.6 |
| 25 ते 45 | 231 | 51.3 |
| 45 ते 60 | 144 | 32.0 |
| 60 पेक्षा अधिक | 41 | 9.1 |
| एकूण | 450 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 233.858; स्वातंत्र्यांशः3; तालिका मूल्यः7.82; pमूल्यः <0.05



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
UGC CARE I

वरील सारणी क्र. 1 मध्ये चंद्रपूर जिल्हातील (राजुरा, कोरपना व जिवती तालुक्यातील) आदिवासी नागरिकांचे वयानुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. अध्ययनाकरिता निवडलेले 7.6 टक्के आदिवासी नागरीकांचे वय 25 वर्षापेक्षा कमी असून 51.3 टक्के नागरिकांचे वय 25 ते 45 वर्ष असल्याचे आढळले. तसेच 32.0 टक्के नागरिक 45 ते 60 वर्षे वयोगटातील असून 9.1 टक्के नागरिकांचा वय 60 वर्षापेक्षा अधिक असल्याचे आढळले.

### 3.2 कुटुंबातील कमविणारे सदस्यांची संख्या

**सारणी क्र. 2:** आदिवासी कुटुंबातील कमविणारे सदस्यांची संख्या याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| सदस्यांची संख्या | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 सदस्य | 51 | 11.3 |
| 2 सदस्य | 222 | 49.3 |
| 3 सदस्य | 117 | 26.0 |
| 4 सदस्य | 39 | 8.7 |
| 4 पेक्षा जास्त सदस्य | 21 | 4.7 |
| एकूण | 450 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 300.4; स्वातंत्र्यांशः4; तालिका मूल्यः9.49; pमूल्यः $<0.05$

वरील सारणी क्र. 2 मध्ये चंद्रपूर जिल्हातील (राजुरा, कोरपना व जिवती तालुक्यातील) आदिवासी कुटुंबातील कमविणारे सदस्यांची संख्या याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. 11.3 टक्के आदिवासी कुटुंबात कमविणारा 1 सदस्य असून 49.3 टक्के व 26.0 टक्के आदिवासी कुटुंबात कमविणारे 2 व 3 सदस्य असल्याचे आढळले. तसेच 8.7 टक्के आदिवासी कुटुंबात 4 कमविणारे सदस्य असून 4.7 टक्के आदिवासी कुटुंबात कमविणारे 4 पेक्षा जास्त सदस्य असल्याचे आढळले.

### 3.3 आदिवासी नागरिकांचा व्यवसाय

**सारणी क्र. 3:** आदिवासी नागरिक करीत असलेला व्यवसाय याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| व्यवसाय | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| शेती | 132 | 29.3 |
| मजूरी | 203 | 45.1 |
| स्वयंरोजगार | 72 | 16.0 |
| खाजगी नोकरी | 43 | 9.6 |
| शासकीय नोकरी | 0 | 0.0 |
| एकूण | 450 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 279.62; स्वातंत्र्यांशः4; तालिका मूल्यः9.49; pमूल्यः $<0.05$

वरील सारणी क्र. 3 मध्ये चंद्रपूर जिल्हातील आदिवासी नागरिक करीत असलेला व्यवसाय याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. 29.3 टक्के आदिवासी नागरिक शेती करीत असून 45.1 टक्के आदिवासी नागरिक मजूरी करत असल्याचे आढळले. तसेच 16.0 टक्के आदिवासी नागरिक स्वयंरोजगार करीत असून 9.6 टक्के आदिवासी नागरिक खाजगी नोकरी करीत असल्याचे आढळले.

### 3.4 आदिवासी नागरिकांचे मासिक उत्पन्न



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

**सारणी क्र. 4:** आदिवासी नागरिकांचे मासिक उत्पन्न याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| मासिक उत्पन्न | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| 5000 रू. पेक्षा कमी | 110 | 24.4 |
| 5000 - 10000 | 269 | 59.8 |
| 10000-20000 | 48 | 10.7 |
| 20000 रू. पेक्षा जास्त | 23 | 5.1 |
| एकूण | 450 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 325.94; स्वातंत्र्यांशः3; तालिका मूल्यः 7.81; pमूल्यः <0.05

वरील सारणी क्र. 4 मध्ये चंद्रपूर जिल्हातील आदिवासी नागरिकांचे मासिक उत्पन्न याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. 24.4 टक्के आदिवासी नागरिकांचा मासिक उत्पन्न 5000 रू. पेक्षा कमी असून 59.8 टक्के आदिवासी नागरिकांचा मासिक उत्पन्न रू. 5000 - 10000 असल्याचे आढळले. तसेच 10.7 टक्के व 5.1 टक्के आदिवासी नागरिकांचा मासिक उत्पन्न रू. 10000-20000 व 20000 रू. पेक्षा जास्त असल्याचे आढळले.

### 3.5 मासिक उत्पन्नातून खर्चाचे प्रमाण

**सारणी क्र. 5:** आदिवासी नागरिकांचे मासिक उत्पन्नातून खर्चाचे प्रमाण याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| खर्चाचे प्रमाण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| उत्पन्नाच्या 10 टक्के पेक्षा कमी | 0 | 0.0 |
| उत्पन्नाच्या 10 ते 19 टक्के | 0 | 0.0 |
| उत्पन्नाच्या 20 ते 29 टक्के | 41 | 9.1 |
| उत्पन्नाच्या 30 ते 39 टक्के | 27 | 6.0 |
| उत्पन्नाच्या 40 ते 49 टक्के | 33 | 7.3 |
| उत्पन्नाच्या 50 ते 59 टक्के | 68 | 15.1 |
| उत्पन्नाच्या 60 ते 69 टक्के | 188 | 41.8 |
| 70 टक्के आणि त्याहून अधिक | 93 | 20.7 |
| एकूण | 450 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 476.50; स्वातंत्र्यांशः 7; तालिका मूल्यः 14.067; pमूल्यः <0.05

वरील सारणी क्र. 5 मध्ये चंद्रपूर जिल्हातील आदिवासी नागरिकांचे मासिक उत्पन्नातून खर्चाचे प्रमाण याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. 9.1 टक्के, 6.0 टक्के व 7.3 टक्के आदिवासी नागरिकांचे खर्चाचे प्रमाण उत्पन्नाच्या 20 ते 29 टक्के, उत्पन्नाच्या 30 ते 39 टक्के व उत्पन्नाच्या 40 ते 49 टक्के असल्याचे आढळले. तसेच 15.1 टक्के व 41.8 टक्के आदिवासी नागरिकांचे खर्चाचे प्रमाण उत्पन्नाच्या 50 ते 59 टक्के व उत्पन्नाच्या 60 ते 69 टक्के आहे तर 20.7 टक्के नागरिकांचे खर्चाचे प्रमाण 70 टक्के आणि त्याहून अधिक असल्याचे आढळले.

### 3.6 व्यवसायातुन मिळणारे उत्पन्नाची पर्याप्तता

**सारणी क्र. 6:** आदिवासी नागरिकांना व्यवसायातुन मिळणारे उत्पन्न पर्याप्त वाटत असणे याबाबत माहिती दर्शविणारी सारणी



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

| प्रतिक्रीया | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 29 | 6.4 |
| नाही | 368 | 81.8 |
| सांगता येत नाही. | 53 | 11.8 |
| एकूण | 450 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 477.16; स्वातंत्र्यांशः 2; तालिका मूल्यः 5.991; pमूल्यः <0.05

वरील सारणी क्र. 6 मध्ये चंद्रपूर जिल्हातील आदिवासी नागरिकांना व्यवसायातुन मिळणारे उत्पन्न पर्याप्त वाटत असणे याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. 6.4 टक्के आदिवासी नागरिकांना व्यवसायातुन मिळणारे उत्पन्न पर्याप्त वाटत असून 11.8 टक्के उत्तरदात्यांनी सांगता येत नाही अशी प्रतिक्रिया दिली. तसेच 81.8 टक्के आदिवासी नागरिकांना व्यवसायातुन मिळणारे उत्पन्न पर्याप्त वाटत नसल्याचे आढळले.

### 3.7 व्यवसायातुन मिळणाऱ्या उत्पन्नापासून कौटुंबिक गरजांची पूर्तता

**सारणी क्र. 7:** आदिवासी नागरिकांच्या व्यवसायातुन मिळणाऱ्या उत्पन्नापासून कौटुंबिक गरजा पूर्ण होत असणे याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| प्रतिक्रीया | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 40 | 8.9 |
| नाही | 383 | 85.1 |
| सांगता येत नाही. | 27 | 6.0 |
| एकूण | 450 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 543.45; स्वातंत्र्यांशः 2; तालिका मूल्यः 5.991; pमूल्यः <0.05

वरील सारणी क्र. 7 मध्ये चंद्रपूर जिल्हातील आदिवासी नागरिकांच्या व्यवसायातुन मिळणाऱ्या उत्पन्नापासून कौटुंबिक गरजा पूर्ण होत असणे याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. 8.9 टक्के आदिवासी नागरिकांप्रमाणे व्यवसायातुन मिळणाऱ्या उत्पन्नापासून त्यांच्या कौटुंबिक गरजा पूर्ण होत असून 6.0 टक्के उत्तरदात्यांनी याबाबत सांगता येत नाही अशी प्रतिक्रिया दिली. तसेच 85.1 टक्के आदिवासी नागरिकांप्रमाणे व्यवसायातुन मिळणाऱ्या उत्पन्नापासून त्यांच्या कौटुंबिक गरजा पूर्ण होत नसल्याचे आढळले.

## 4. निष्कर्ष

### 4.1 आदिवासी नागरिकांचे वयानुसार वर्गीकरण

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की अध्ययन क्षेत्रातील बहुतांश आदिवासी नागरिक 25 ते 45 वर्षे वयोगटातील आहेत.

### 4.2 कुटुंबातील कमविणारे सदस्यांची संख्या

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की अध्ययन क्षेत्रातील बहुतांश आदिवासी कुटुंबात कमविणारे 2 सदस्य आहेत.

### 4.3 आदिवासी नागरिक करीत असलेला व्यवसाय



Copyright © | JET Network, All Rights Reserved

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की अध्ययन क्षेत्रातील बहुतांश आदिवासी नागरिक मजूरी करतात.

**4.4 आदिवासी नागरिकांचे मासिक उत्पन्न**

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की अध्ययन क्षेत्रातील बहुतांश आदिवासी नागरिकांचे मासिक उत्पन्न रू. 5000 - 10000 इतके आहे.

**4.5 मासिक उत्पन्नातून खर्चाचे प्रमाण**

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की अध्ययन क्षेत्रातील बहुतांश आदिवासी नागरिकांचा खर्चाचे प्रमाण उत्पन्नाच्या 60 ते 69 टक्के आहे.

**4.6 व्यवसायातुन मिळणारे उत्पन्न पर्याप्त वाटते**

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की अध्ययन क्षेत्रातील बहुतांश आदिवासी नागरिकांना व्यवसायातुन मिळणारे उत्पन्न पर्याप्त वाटत नाही.

**4.7 व्यवसायातुन मिळणाऱ्या उत्पन्नापासून कौटुंबिक गरजा पूर्ण होतात**

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की अध्ययन क्षेत्रातील बहुतांश आदिवासी नागरिकांच्या व्यवसायातुन मिळणाऱ्या उत्पन्नापासून त्यांच्या कौटुंबिक गरजा पूर्ण होत नाही.

**5. आधारग्रंथ सूची**


1. बोधनकर सु., अलोनी वि., सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2003:147.
2. जरारे वि., संशोधन प्रणाली, सुविधा पब्लिशर्स, 35-ए, नटराज नगर, इमली फाटक, जयपूर, 1995:79
3. वर्मा ओ., सामाजिक अनुसंधान की विधियाँ, ग्रन्युत प्रिंटिंग प्रेस सांकेत नगर, कानपूर, 1987:335
4. उगले, सु. (2009), नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकासात बाएफ मित्र या स्वयंसेवी संस्थेचे योगदान, अर्धांगवाद, 33(2), पृ.149-162.
5. Bhilavekar D., Kale N. M. and Satapathy B. (2025). Agricultural and Livelihood Development of Tribal Communities in Melghat: Challenges and Recommendations, Asian Journal of Agricultural Extension, Economics & Sociology, 43(1), pp.57-62.
6. Dahiwale, G. S and Desai, R. S. (2024). Tribal Development In Maharashtra: Assessing The Impact Of Government Schemes In Ahmednagar, Young Researcher A Multidisciplinary Peer Reviewed Referred Research Journal, 13(1), pp. 197-206.
7. Dungdung K. and Pattanaik B. K. (2020). Tribal development disparities in Odisha: an empirical analysis, South Asia Research, 40(1), pp.94-110.
8. Kulkarni K. and Shivagunde S. (2022). Virtual regions strategy for development of tribal communities, Review of Market Integration, 14(1), pp.64-74.
9. Shankar A. and Lavanya B. (2017). Tribal development policies and programmes in india-a study of telangana state, The Indian Journal of Political Science, 78(3), pp.387-394.




Copyright © | JET Network, All Rights Reserved